# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक : 12.09.2026** **वार : शनिवार**

**सिंबायोसिस उपक्रम**

सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र तसंच सिंबायोसिस वैद्यकीय महिला महाविद्यालयानं संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या 'माहेरवाशीण – मातृत्व सेवेची नवी संकल्पना' या अभिनव उपक्रमाचा आज लवळे इथं आरंभ करण्यात आला. गर्भवती मातांसाठी तयार करण्यात आलेल्या 'माहेरवाशीण' माहिती पुस्तिकेचे प्रकाशन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. "सुरक्षित मातृत्व ही केवळ आरोग्य व्यवस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी म्हणाल्या. मातेला वैद्यकीय उपचारांसोबतच मानसिक आधार, सन्मान आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणं आवश्यक असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**भरतीपरीक्षा संवाद**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतीला अधिक बळकटी देऊन उमेदवाराच्या दृष्टीने भरती प्रक्रिया सुलभ करण्यासाठी गतिमान आणि पारदर्शक परीक्षा पद्धतीचा अवलंब करू असं आश्वासन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव तथा समितीच्या अध्यक्षा व्ही. राधा यांनी दिलं. यासंदर्भात नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय टास्क फोर्सच्या वतीनं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. राज्यातील भरती परीक्षा संदर्भात एसओपी तयार केली जाईल. परीक्षेमधील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रश्नपत्रिका परीक्षेच्या काही तास अगोदर तयार होणं आवश्यक आहे, प्रश्नपत्रिकेची गुणवत्ता उत्तम दर्जाची ठेवून उत्तरपत्रिकेची तपासणी पारदर्शक रित्या होण्यावर भर राहील असं व्ही. राधा यांनी सांगितलं.

दरम्यान या उच्चस्तरीय टास्क फोर्सनं आज स्पर्धा परीक्षा विद्यार्थी, उमेदवार तसेच भरती परीक्षा प्रक्रियेशी संबंधित विविध घटकांशी थेट संवाद साधला. यावेळी संबंधितांनी परीक्षेसंदर्भात आपल्या सूचना मांडल्या.

**पीडीसीसी सभा**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत अल्पबचत भवन इथं आज पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची १०९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी बोलताना त्यांनी बँकेच्या वाटचालीत दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेले योगदान, त्यांचे सहकार क्षेत्राशी असलेले अतूट नाते आणि बँकेच्या विकासासाठी त्यांनी घेतलेल्या निर्णयांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

**रेल्वेब्लॉक**

पुणे रेल्वे स्थानक परिसरातील पायाभूत सुविधांच्या कामांसाठी मध्य रेल्वेच्या पुणे विभागाकडून उद्या रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत नऊ तासांचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे.

या कालावधीत पुणे-मुंबई एक्स्प्रेससह सात गाड्या रद्द करण्यात येणार आहेत.विशेष ब्लॉकमुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम होणार असल्याने प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना गाड्यांची सद्यस्थिती तपासावी, असं आवाहन मध्य रेल्वेनं केलं आहे.

**<u>मद्यविक्री प्रतिबंध</u>**

गणेशोत्सव काळात पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये अवैध मद्यविक्री आणि मद्यतस्करीला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने २१ विशेष पथकं नियुक्त केली आहेत. १४ सप्टेंबरला गणेश चतुर्थीच्या दिवशी सायंकाळी चार वाजेपर्यंत, तर २५ सप्टेंबरला अनंत चतुर्दशीच्या दिवशी संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद राहणार आहे.

**<u>विसर्जन घाट पाहणी</u>**

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख विसर्जन घाटांवर करण्यात आलेल्या स्वच्छता, सुरक्षा आणि नागरिकांसाठीच्या सुविधांची महापौर रवि लांडगे यांनी आज पाहणी केली.विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व आवश्यक सुविधा वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**<u>देखरेख शुल्क</u>**

पुणे शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या झाडणकामाच्या प्रायोगिक प्रकल्पातील कंत्राटदारांना कामाच्या देखरेखीसाठी देण्यात येणारे शुल्क कमी करण्यात येणार आहे. कंत्राटदारांच्या मासिक देयकाच्या १० टक्क्यांऐवजी आठ टक्के रक्कम ‘देखरेख शुल्क’ म्हणून देण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. अतिरिक्त महापालिका आयुक्तांच्या सूचनेनुसार हा बदल करण्यात आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याबरोबरच कचऱ्याबाबतच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी महापालिकेने तीन महिन्यांसाठी हा प्रायोगिक प्रकल्प सुरू केला आहे.

**<u>पिंचि उद्दीष्ट</u>**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी एक हजार ३०० कोटी रुपयांच्या मालमत्ता कर वसुलीचं उद्दिष्ट निश्चित केलं आहे. बिगरनिवासी आणि औद्योगिक मालमत्तांच्या थकबाकी वसुलीला प्राधान्य देण्यात येणार आहे. थकबाकीदारांना ३० सप्टेंबरपूर्वी नोटिसा बजावून, एक ऑक्टोबरपासून मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू केली जाणार आहे. अंतिम मुदतीपर्यंत ऑनलाइन मालमत्ता कर भरल्यास सामान्य करावर चार टक्के सवलत देण्यात असून नागरिकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असं महापालिकेनं आवाहन केले आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दुपारी तीन वाजेपर्यंत कडक ऊन होतं. त्यानंतर बऱ्याच ठिकाणी वातावरण ढगाळ झालं. उद्या दुपारनंतर काही भागात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**